संत झेवियर्स महाविद्यालय

## मराठी वाङ्मय मंडळ

# ॥ तेजोमय ॥

## प्रवासाच्या पाऊलखुणा



वर्ष चौथे



संपादक

प्रांजली खेमनर

सह संपादक

शांभवी मोरे

अक्षर जुळवणी व सजावट

जेसन कुटिन्हो

# तेजोमय

मुंबई विद्यापीठातील सर्वात जुने मराठी वङ्मय मंडळ अशी ख्याती असलेल्या संत झेवियर्स महाविद्यालयातील  मराठी वङ्मय मंडळाची स्थापना १९२३ साली झाली, यंदा मंडळाचे हे ९३ वे वर्ष.

झेवियर्समधील विद्यार्थींना मराठीतून आपले विचार व्यक्त करता यावे आणि मराठी भाषेला दिवाळी अंकाची जी परंपरा लाभली आहे त्याला आपल्या परीने पुढे नेण्याचा एक प्रयत्न म्हणून तेजोमय या दिवाळी अंकाची सुरुवात झाली. तेजोमयचे यंदाचे हे चौथे वर्ष. आपल्या युवा विद्यार्थ्यांच्या लेखन शैलीचा आस्वादया अंकातून वाचक रसीकांना घेता येतो. गेली चार वर्षे तेजोमय सातत्याने मराठी साहित्य क्षेत्रात आपला खारीचा वाटा उचलत आहे. त्यामुळे आजच्या युवा पिढी कडून तेजोमयचे होणारे स्वागत मराठी भाषेतील गोडवा वाढत असल्याची ग्वाही देते.

गेली ९३ वर्षे मराठी वङ्मय मंडळ आपल्या विविध उपक्रमांद्वारे तरुणांच्या कलेला वावदेण्याचे कार्य करत आहे. मंडळाचा आमोद हा वार्षिक सोहळा त्यातलाच एक भाग. तसेच तेजोमय हा दिवाळी अंक व पखरणहा वार्षिक अंकया मंडळाच्या प्रकाशनाद्वारे युवा पिढीचे विचार सहज दिसून येतात.


'Travelling gives you confidence to feel free'  हे इंग्रजी वाक्य मध्यं तरी वाचनात आलं होतं. पण आजच्या युवा पिढीची प्रवासाची व्याख्या काय आहे. ट्रेन, बस, विमान यांच्या मुळे ‘इनस्टन्ट’ प्रवास करणे सोपे झाले असताना, आणि इन्टरने टमुळे देशो देशीचे देखावे घरबसल्या बघता येणं शक्य असतानाही, आजचा तरुण खांद्याला सॅक अडकवून आणि जीपीएस्नामक वाटा ड्यालासोबत घेऊन कुठल्याहेतूने मुशाफिरीसाठी घराबाहेर निघतो, हे जाणून घेणं खूपच मजेशीरहोतं. प्रवासाच्या याच विविध छटा शब्दरुपाने वाचकां समोर मांडतायाव्यात म्हणून या वर्षीच्या तेजोमयचा विषय प्रवास ठेवण्याचं ठरवलं.

तेजोमय या दिवाळी अंकाचे संपादन करण्याची जबाबदारी स्वीकारताना मनावर थोडंदडपण होतं. पण मंडळाच्या कार्यकारिणीने आमच्या वर विश्वास ठेवल्यामुळे हे कार्य सुरळीत पार पडले. मराठी वङ्मय मंडळाची सचिव मनोज्ञा तुरुमेल्ला, उपसचिव प्रांजल हळडणकर, तसेच संपूर्ण कार्यकारिणीच्या सहकार्यामुळेच आज ही तेजोमयची आवृत्ती तुम्हा वाचकांच्या हाती सुपूर्त करत आहोत. मराठी वङ्मय मंडळाला सदैव प्रोत्साहन देणारे आमचे प्राचार्य डॉ. ॲग्नेलो मिनेझीस आणि मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र शिंदे यांचे ही आम्ही

आभारी आहोत. तेजोमयच्या संपादनात आम्हाला मोलाचे मार्ग दर्शन करणाऱ्या मेधा तासकर (ग्रंथालय प्रमुख) तसेच हर्षद पारकेर (माजी संपादक) यांचे ही आम्ही ऋणी आहोत.

आमचे सर्व लेखक, वाचक, जाहीरातदार आणि हित चिंतकांचे मनःपूर्वक आभार.

आशा करतो की तेजोमयचा हा अंक तुम्हाला सोपवताना आम्हाला जितका आनंद होत आहे त्याही पेक्षा अधिक आनंद तुम्हला तो वाचताना होईल. हॅप्पी जर्नी.





प्रांजली खेमनर
संपादक

शांभवी मोरे
संपादक

# क्षणभर विश्रांती

रिया बिडये,
प्रथम वर्ष,
विज्ञान

प्रवास हा शब्द ऐकला की प्रत्येकाच्या मनातील एक खिडकी उघडते. त्या खिडकी बाहेर प्रत्येकाला वेगळं दृश्य दिसतं. काहींना परदेश दिसतो, काहींना शाळेची सहल, काहींना मित्रांसोबत केलेला प्रवास आठवतो. तसेच माझ्या मनातील खिडकी मला एक अगदी छबीदार चित्र दाखवते- लाल माती, हिरवा निसर्ग, नारळीची झाडं, आमराई, कौलारू घरं व लांबलचक समुद्रकिनारा. . . .'कोकण' हा शब्द ऐकला की लोकांना ह्या काही ठराविक गोष्टी आठवतात. माझ्यासाठी कोकण म्हणजे माझा परिवार! शहरात राहणारे आमचे सगळे नातेवाईक वर्षातून एकदा आवर्जून रत्नागिरीतल्या आमच्या छोट्याशा गावात भेटतात. गाव अगदी छोटसं, परंतु तिथल्या लोकांची मनं मात्र खूप मोठी.

शहरात राहून आपल्या आयुष्याला एक वेगळीच गती मिळते. शाळा, घर, काम, अभ्यास असा दिनक्रम असतो. घड्याळ आपल्यासाठी थांबत नाही, आणि बघता बघता वर्ष कसं निघून जातं कळतही नाही. त्या एका वर्षात शहर बदलतं. जुन्या इमारती तुटतात, नव्या उभारल्या जातात. तसंच आपल्या आजूबाजूची माणसंही बदलतात. लहान भावंडं वयाने व विचाराने मोठी होतात. प्रत्येकाच्या वेगवेगळ्या चिंता, वेगवेगळी स्वप्ने, बघता बघता समोरचा माणूस अनोळखी वाटू लागतो. पण दरवर्षी येणारी ती सुट्टी आणि तो प्रवास, हे काही बदलत नाही. मे महिना आला की पॅकिंगची तीच धावपळ सुरू होते . मग ठरल्या प्रमाणे पहाटे उठायचं, सामान ओढत स्टेशनपर्यंत न्यायचं, ब्रिज चढून प्लॅटफॉर्मवर यायचं आणि ट्रेनच्या घोषणेची वाट पाहायची. मग नेहमी प्रमाणे ट्रेनला उशीर हा होणारच. प्रवासाचा हा भाग कितीही त्रासदायक असला, तरीही आपल्या साथीदारांमुळे तोही मजेशीर वाटू लागतो.

एकदाची ती ट्रेन आली, की मग खरी गंमत सुरू होते .गप्पा गोष्टी, पत्ते, अंताक्षरी, ह्या सगळ्यात आम्ही रमून जातो. कधी-कधी काही न करता फक्त ट्रेनच्या त्या छोट्याश्या खिडकी बाहेर नुसते बघत रहावेसे वाटते. खिडकी बाहेरचे ते दृश्य हे दरवर्षी तसेच्या तसेच असते- मुंबईहून निघाल्यावर पहिले शहरं, गर्दी, प्रदूषित हवा. मग हळूहळू लहान गावं, शेती, व सगळीकडे हिरवळीचे साम्राज्य दिसू लागतं. हे चित्र असतं खिडकीच्या पलिकडचं मात्र खिडकीच्या अलिकडचं चित्रही वर्षानुवर्ष तसंच असतं. वर्षभरात आमच्या आयुष्यात कितीही बदल आले, तरीही त्या दिवशी,त्या प्रवासादरम्यान आमची तीच मस्ती, तीच मजा, त्याच गप्पा चालू असतात. आणि वर्षानुवर्ष तीच नाती आणि त्याच भावना अगदी भक्कम राहतात.

शेवटी एकदाचे गावी आलो, की मग एक वेगळीच शांतता अनुभवायला मिळते. ही शांतता, शहरापासून, रोजच्या कटकटीपासून दूर एक मोकळा श्वास घेण्याची संधी देते. ही शांतता, हा

थंडगार वारा, समुद्रावरील लाटांची लय विचार करायला भाग पाडते. हे खरं आहे की आपण त्या सतत बदलत असलेल्या शहरापासून दूर जाण्यासाठी ह्या गावाकडे येतो. येथे येऊन जुनी घरं, तो निसर्ग पाहून मनाला शांतता मिळते .पण नीट विचार केला, तर हळूहळू आपल्याला जाणवते की ती जागा जरी तशीच असली, तरीही त्या जागेचे आणि त्या प्रवासाचे आपले अनुभव हे दरवर्षी काही वेगळेच असतात. लहानपणी आपण मजा-मस्ती करणे, आजीच्या हातच्या जेवणावर ताव मारणे ह्यात मग्न असतो. पण जसे आपण मोठे होत जातो, तसे त्या जागेचे आपल्या मनात एक वेगळेच महत्व निर्माण होत जाते. आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींमध्ये आपल्याला फरक जाणवू लागतो. आईबाबांच्या कपाळावरच्या आठ्या गायब होतात, त्यांच्या हास्यात एक वेगळाच मोकळेपणा दिसतो.

गाव आणि गावच्या आठवणींचं आपल्या मनात एक खास स्थान असतं. या मनातल्या कप्प्यात असतात गावातील माणसं, त्यांच्या आठवणी, प्रवासादरम्यान त्यांच्याशी बदलत जाणारं आपलं नातं, त्यांच्याशी जुळलेले ऋणानुबंध.

मला आपलं आयुष्यही या ट्रेनच्या प्रवासासारखंच भासतं ...ट्रेनसारखं आयुष्यही भराभर एक एक स्टेशन घेत पुढे जात असतं. ती स्टेशन असतात यशाची, अपयशाची, आयुष्यातील चढउतारांची. पण कधीतरी या भराभर पुढे जाणाऱ्या आयुष्यातून सुट्टी घेऊन गाव नामक छोट्या स्टेशनावर थांबावं आणि खरी शांतता अनुभवावी. कुणास ठाऊक ती शांतता तुम्हाला काय सांगेल?

"शेवटी बदल हा प्रवासात नाही,
तर प्रवाश्यात होत असतो."

©thinkstock by Getty Images

# मुंबई दर्शन

क्षिती शोभाविकास,
एस.वाय्.जे.सी. कला

भल्या पहाटे डोळे उघडले आणि पहिला विचार आला तो म्हणजे आजचा दिवस नक्कीच विलक्षण असणार... . जन्मापासून आतापर्यंत मुंबई हे माझे पहिले घर. तशी मी मुंबईचीच असल्यामुळे लहानपणापासून मुंबईतील कित्येक ठिकाणे खूप वेळा पाहिली आहेत. पण आज एका त्रयस्थ व्यक्तीच्या दृष्टीकोनातून मी माझ्या मातृभूमीला पाहणार होते . मनात एक वेगळीच उत्सुकता होती. माझा स्कार्फ आणि उन्हाचा चष्मा घेऊन मी प्रवासाच्या आरंभस्थानी येऊन पोहोचले. सगळी मुंबईबाहेरची माणसं अगदी उत्सुकतेने ही अद्‌भुतनगरी पहायला तयार झाली होती . एक नवविवाहीत ग्रामीण जोडपं रंगीत चष्मे लावून सेल्फी काढण्यात दंग होते तर एक आजी स्वतःचा पदर नीट करत होत्या. वातावरणात सर्वत्र जिज्ञासूवृत्तीचा प्रत्यय येत होता. काही वेळातच आमची रंगीबेरंगी फुग्यांनी सजविलेली बस आमच्यापर्यंत येऊन पोहोचली; जणू ती आग्रहाने आम्हाला बोलवत होती. बसमध्ये बसल्यावर वाऱ्याची नाजूक झुळूक माझ्या चेहऱ्यावर खेळू लागली. विविध रंगांचे पेहराव केलेली माणसं, गरीब-श्रीमंत, सर्वच एका रस्त्याने जाताना दिसत होते. मंदिर, मस्जिद, चर्च वगैरे धार्मिक स्थळे रांगेत शांतपणे उभी होती. हेच तर मुंबईचे वैशिष्ट्य आहे . लोक जात-धर्म, स्त्री-पुरुष हा भेद विसरून आपली रोजीरोटी कमवत असतात . परस्परांचा, त्यांच्या संस्कृतीचा आदर करीत एकोप्याने राहतात . आम्ही मुंबईकर ज्या उत्साहात गणपतीच्या मिरवणूकीत नाचतो त्याच उत्साहात नऊदिवस गरबा खेळतो, तेवढ्याच उत्साहाने नाताळचे स्वागत करतो आणि ईदला शीर खुरमा खातो. मुंबई म्हणजे जणू नानाविध संस्कृतींचा मेळ.

बघता बघता समुद्राच्या खाऱ्यापाण्याचा गंध सर्वत्र दरवळू लागला. जेवणात मिठाची कमी भरुन आल्यावर जो आनंद होतो तोच आनंद भर ऊन्हात समुद्र पाहिल्यावर झाला. रस्त्याच्याकडेने ऐतिहासिक इमारती ओळीने मांडलेल्या, त्यांचे दगडी बांधकाम हे वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. छत्रपती शिवाजी टर्मिनसची इमारत, मुंबई महानगरपालिका, सेंट झेवियर्स महविद्यालय, टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई हायकोर्ट, मुंबई विद्यापीठ, एका पेक्षा एक इमारती, त्यांची शिस्तबद्ध ठेवण आणि नक्षीदार बांधकाम डोळ्यात सामावून घेत आम्ही बघता बघता गेट वे ऑफ इंडियाला पोहोचलो. ही बलदंड वास्तू बघून मन अभिमानाने भरून आले . समुद्राच्या लहरींवर असंख्य पक्षी आनंदाने विहार करत होते . माणसांच्या गर्दीत हरवून गेलेला निसर्ग हा असा येथे भेटतो. साडीवरच्या नक्षीकामाप्रमाणे पाण्यावर किनाऱ्याला लागून रंगीबेरंगी होड्या डुलताना बघून मनही डोलू लागले. अनेक लोक येथ येणाऱ्या पर्यटकांवर आपली उपजिविका चालवितात. फोटोग्राफर फोटो काढण्याचा धंदा करत होते. आणि बघता बघता

त्याच्या फोटोग्राफीच्या किमयेने स्मोरच्या ताज महाल पॅलेस हॉटेलचे टोक माझ्या बोटांमध्ये होते.

ऊन वाढू लागले, तसे आम्ही छत्रपती शिवाजीमहाराज म्युझियम मध्ये गेलो. चटके देणाऱ्या ऊन्हात लोकं कशी कामं करतात हे राबणाया मुंबईकरांकडून शिकण्यासारखे आहे. म्युझियममध्ये विविध वस्तूंचा संग्रह व त्यांची माहिती पाहून माझ्या मनात त्यांच्या बद्दलचा आदर व्दिगुणीत झाला. दुपारच्या तापलेल्या ऊन्हात आम्हाला ऊसाचा रस दिला तेव्हा मन जरा शांत झाले. येथे ऊन्हात एका जागेवर बसणं शक्य होत नव्हतं, इतर लोक बांधकाम व मजुरीची कामे कशी करत असतील?

तारापोरवाला मत्स्यालयामध्ये रंगीबेरंगी व विविध आकाराचे मासे बघून मन तृप्त झाले. तिथे शार्क माशाचा भलामोठा सांगाडा ठेवला होता, तो बघून थोडं घाबरायलाच झालं. ज्या माशाला आपण चवीने खातो तो हा भलामोठा मासा आपल्यासारखी दोन माणसं खाऊन पचवत असेल असा विचार मनात आला आणि पटकन पुढे निघून गेले. खाऊगल्ली म्हणजे विविध खाद्य पदार्थांची रेलेचेल, पंजाबी, मराठी, साऊथ इंडियन तसेच चायनिज पदार्थ येथे मिळतात. पावभाजीवर ताव मारून आम्ही ऊन उतरल्यानंतर हॅगिंगगार्डन मध्ये गेलो. हा बगीचा पाण्याच्या टाकीवर उभारलेला आहे त्यामुळे याला हॅगिंगगार्डन असे म्हणतात. तिथला म्हातारीचा मोठा बूट मला लहानपणी खूप घाबरवायचा इतकी सुदृढ आजी, म्हातारी झालीच कशी हेच मला कळेना.

इत्की आश्चर्यदायक ठिकाणं, गोष्टी व माणसे अगदी आपल्या आजूबाजूला रोज फिरकत असतात तरी देखील आपण आयुष्यातल्या क्षुल्लक आणि रोजच्या व्यापामुळे, हातातील संधीचा व मिळालेल्या नवीन दिवसाचा विचार न करता वाया घालवतो. वर्तमानकाळात जगणारी खूप कमी लोकं उरल्याचा वारंवार भास होतो. या सगळ्या विचारात हरवले असताना आम्ही मरिन ड्राईव्हला कधी पोहोचलो ते कळलेच नाही. मुंबईतल्या माझ्या आवडत्या जागेत सुर्यास्त बघायचा म्हणजे माझ्यासाठी पर्वणीचढ स्मुद्राजवळ आले की अगदी हलके वाटू लागते जसे की आपल्या सगळ्या चिंता कुणीतरी हळुवारपणे बाजूला ठेवल्यात. किनाऱ्यावरच्या दगडांवर आपटणाऱ्या लाटा त्या दगडांवरचा काही भाग आपल्याबरोबर घेऊन जातात. काही तसाच प्रभाव या पाण्याचा माझ्या मनावर देखील होतो, प्रत्येकवेळी माझं एक तरी दुःखं थोडं हलकं होतं. इथला रमणीय सूर्यास्त बघताना कायम वाटतं की सूर्य आता अस्ताला जाईल पण तो जरी गेला तरी त्याची प्रतिमा डोळ्यात आणि हृदयात नेहमीच तरळत राहते.

बसमधून उतरून घरी जाण्याची वेळ झाली तेव्हा मनात थोडी हुरहुर होती, पण शेवटी मुंबई आपलीच आहे. या प्रवासाने मला माझ्या मायानगरीला पाहायचा एक वेगळा दृष्टीकोन तर दिलाच पण इथल्या प्रत्येक ठिकाणाशी एक वेगळं नातं निर्माण करायची संधीही दिली याचे अतिशय समाधान वाटले.

# प्रवास-एक बदल

अंतरा मोने,
तृतीय वर्ष,
कला


७ डिसेंबर २००५, तारीख आजही चांगली लक्षात आहे माझ्या. माझ्या आयुष्याला कलाटणी देणारी बातमी मला मिळाली मल्लखांबाच्या २५व्या ज्युनियर व सीनियर नॅशनल्स्‌साठी माझी निवड झालेली मला कधी एकदा घरी जातेय आणि ही बातमी सांगतेय असं झालेलं. सुदैवाने त्यादिवशी आम्हाला शाळेतून लवकर सोडण्यात आलं आणि कधी नव्हे ते मी थेट पळत घरी गेले. आई बाबांना ही बातमी कळल्यावर तेही खूप खूष झाले. बाबांना जणूकाही त्यांचं स्वप्न पूर्ण झाल्यासारखं वाटलं.

नॅशनल्स्‌ पंजाबमध्ये होणार होत्या. मी निघायच्या दहा दिवस आधीपासूनच सामानाची आवराआवर करण्याची सरुवात केली, प्रॅक्टीसही जोमाने सुरू केली. मी जाण्यासाठी इतकी आतुर होते की ते दहा दिवस कसे गेले हे कळलं सुध्दा नाही. जाण्याचा दिवस उजाडला तेव्हा माझ्या लक्षात आलं की पुढचे दहा दिवस आई व ताई माझ्या सोबत नसणार. सगळा आनंद अगदी ओसरून गेला. मनात भीती दाटून आली. ताई आणि आईला सोडून इतक्या लांब मी पहिल्यांदाच प्रवास करणार होते. माझ्या मनात असंख्य प्रश्न दाटून आले. माझ्या सोबतचे खेळाडू कसे असतील? मी संपूर्ण प्रवासात बोलू कोणाशी? काही लागलं तर सांगू कोणाला? अशा कितीतरी प्रश्नांनी मला घेरलं होतं. पण बाबा सोबत आहेत या एका गोष्टीचं मला समाधान वाटत होतं.

मी स्टेशनवर ठरलेल्या वेळेआधीच पोहोचले. मात्र निघतेवेळी आम्हाला सांगितलं गेलं की पालक आणि मुलांना संपूर्ण प्रवासभर एकमेकांशी भेटण्या-बोलण्याची परवानगी नाही! माझा उरलासुरला सगळा धीर गेला. अगदी रडायचंच बाकी राहिलेलं माझं. बाबांचा निरोप घेऊन मी डब्यात चढले. या सगळ्या घटनांमुळे मी अगदी खचून गेले. माझा सगळा आत्मविश्वास गळून पडला. ट्रेनमध्ये मी अगदी शांत बसले असतानाच सीनियर टिम मधली संस्कृती ताई माझ्या जवळ आली आणि स्वतःहून माझ्याशी बोलू लागली. तिच्याशी बोलताना मला अगदी माझ्या ताईची आठवण आली. संस्कृती ताईने माझी सगळ्यांशी ओळख करून दिली. हळू-हळू माझी कळी खुलू लागली. मी सगळ्यांशी गप्पा मारायला सुरुवात केली आणि सगळ्यांपेक्षा लहान असल्याकारणाने सगळ्यांची लाडकी होऊन गेले. काही तासांपूर्वी माझ्या मनात जी धाकधूक, भीती होती ती अगदी कुठच्या कुठे पळून गेली. पुढचे दोन दिवस गप्पा-गोष्टी करण्यात, गाणी गाण्यात अगदी मजेत गेले. मी डब्यामध्ये नाचले सुध्दा! या दादर ते पंजाबमधल्या प्रवासादरम्यान मला माझा हरवलेला आत्मविश्वास पुन्हा मिळवून दिला आणि तो आत्मविश्वास माझ्या खेळामध्ये सुध्दा दिसून आला. मी संपूर्ण भारतातून १२ वर्षाखालील वयोगटातून दुसरी आले.

जिंकल्यामुळे मिळालेला आत्मविश्वास

आणि प्रवासादरम्यान मिळालेलं सगळ्यांचं प्रेम हा खजिना घेऊन मी परतले. पुढची फायनल्स् चेन्नईला होणार होती. त्यासाठी मी अगदी कसून प्रॅक्टिस सुरू केली. बघता बघता जाण्याचा दिवस येऊन ठेपला. या वेळेस मात्र मी आत्मविश्वासाने व आनंदाने ट्रेनमध्ये चढले. या खेपेला बरेच नवीन चेहरे दिसत होते, नवीन मित्रमैत्रीणी बनवायचे हे ठरवूनच मी ट्रेनमध्ये चढले, पण झालं अगदी उलटच. त्या सगळ्यांचा खेळाबद्दलचा नकारात्मक दृष्टीकोन पाहून मला त्यांच्याशी बोलण्याचीसुद्धा इच्छा झाली नाही. या सगळ्यामुळे माझा आत्मविश्वास डळमळत चालला होता. मुंबई ते चेन्नई हा संपूर्ण प्रवास मी माझ्या पहिल्या नॅशनल्स्च्या प्रवासाच्या गोड आठवणींच्या मदतीने घालवला. या सगळ्याचा व्हायचा तो विपरीत परिणाम माझ्या खेळावर झाला. माझा खेळ तितका चांगला झाला नाही. माझ्या तिसऱ्या नॅशनल्स्च्या वेळेस मी वरच्या गटात प्रवेश केला, पण या वेळेस नियम बदलल्यामुळे ज्युनियर आणि सीनियरच्या नॅशनल्स् वेगळ्या केल्या गेल्या. म्हणून संस्कृती ताईने मला जसं सांभाळून घेतलं तसं मला कोणा चिमुर्डीला धीर देता येणार नाही, या गोष्टीची खंत वाटत होती. त्या वर्षी दहावी असल्यामुळे मी संपूर्ण प्रवासभर अभ्यास करायचा या हेतूने पुस्तकं घेऊन गेले होते. पण डब्यामध्ये सगळ्यांची मजामस्करी सुरू झाली आणि माझा अभ्यास बाजूलाच राहिला!



असे एकूण सहा नॅशनल्स् मी खेळले, प्रत्येक वेळी नवीन लोकं, नवे अनुभव, आणि या सगळ्यामुळे मिळालेली नवी शिकवण. या सगळ्यांमुळे एक गोष्ट कळली ती म्हणजे प्रवास आणि प्रवासादरम्यान भेटलेल्या माणसांचा आपल्या खेळावर बऱ्याच प्रमाणावर परिणाम होत असतो. खेळाइतक्याच या प्रवासांबद्दलच्या आठवणीसुद्धा माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. मल्लखांबमुळे मला भारतातील विविध ठिकाणांना भेट देण्याची संधी मिळाली, आणि प्रत्येक ठिकाणचे अनुभव, तिथल्या माणसांचा खेळाविषयीचा दृष्टीकोन वेगळा होता. या संपूर्ण प्रवासात आम्ही मुलं-मुलं एकमेकांना आधार द्यायचो, काही हवं नको ते बघायचो, सावरायचो, आत्मविश्वास द्यायचो. या प्रवासांमुळे मी खेळाडू म्हणूनच नाही, तर एक माणूस म्हणूनही समृध्द होत गेले.

# DRESS YOUR EYES



iFest

New arrivals from fashion capitals across the world.

Ray-Ban GENUINE SINCE 1937

VOGUE eyewear

OAKLEY PERFORMANCE DEFINED

PRADA EYEWEAR

TOMMY HILFIGER EYEWEAR

EMPORIO ARMANI

GIORGIO ARMANI

Lawrence & Mayo

Setting trends since 1877

Toll Free: 1800 102 1877 www.lawrenceandmayo.co.in

**D.N. ROAD:** 022 22076049, 51, 22071827, **CUFF PARADE:** 2216 7567, **KANDIVALI:** 28010113, 2801 0115, **ANDHERI:** 2631 3376, **SANTACRUZ:** 26490984, 65242240, **NEPEANSEA ROAD:** 23631649/23634579, **PEDDER ROAD:** 2354 1094/2354 1095, **BANDRA:** 26419446/7, **BORIVALI:** 28904002/28904003, **NAUPADA:** 25337135/136, **POKHRAN ROAD:** 21715058/59, **DOMBIVLI:** (0251)/95251-2420693/96, **GHATKOPAR:** 21022173/21021134/32905064, **VASHI:** 27889649/50, 32211750, **VIRAR:** 0250 2515960/30/3299549, **MULUND:** 25687572, 25687573, **GIRGAON:** 23883421/23883422, **PANVEL:** 27454710/27454711

*Conditions Apply

essilor
World's No. 1 in spectacle lenses

# SWITCH TO THE NEW-AGE PROGRESSIVE SPECTACLE LENSES.

## 100% SATISFACTION GUARANTEED!




Terms and conditions apply

Varilux Insurance Provided

LIVE OPTICS
TRACKS EYE TO HEAD MOVEMENT IN MULTIPLE CONDITIONS

PERFECT NEAR, MID & FAR VISION

NO DISTORTION IN VISION

100% Satisfaction Guaranteed

iFest

Lawrence & Mayo

Setting trends since 1877

**MUMBAI BRANCHES**

ANDHERI: Tel.: 022-2631 3376 • BANDRA: Tel.: 022-2641 9446 / 7 Mob.: 91-9004368883
BORIVALI: Tel.: 022-2890 4002 / 3 • CUFFE PARADE: Tel.: 022-2216 7567
D.N.ROAD: Tel.: 022-2207 6049 / 51 / 2207 1827 • GHATKOPAR: Tel.: 022-2102 2173 / 2102 1134 / 3290 5064
GIRGAON : Tel.: 022-2388 3421 / 2 • KANDIVALI: Tel.: 022-2801 0113 / 5
MULUND: Tel.: 022-2568 7572 / 3 / 3225 2603 • NEPEANSEA ROAD: Tel.: 022-2363 1649 / 2363 4579
PANVEL: Tel.: 022-2745 4710 / 11 • PEDDER ROAD: Tel.: 022-2354 1094 / 5
SANTACRUZ: Tel.: 022-2649 0984 / 2649 1780 / 6524 2240
VASHI: Tel.: 022-2788 9649 / 50 / 3221 1750 • VIRAR: Tel.: 0250-2515960 / 30

**THANE BRANCHES**

DOMBIVLI: Tel.: 0251-2420693 / 96
NAUPADA: Tel.: 022-2533 7135 / 6 • POKHRAN ROAD:Tel.: 022-2171 5058 / 9

To know more about Varilux, Call toll-free **1800-102-1877.**

# ऍकला चालो रे ...

स्वानंदी नूलकर,
प्रथम वर्ष,
विज्ञान

पहाटे पहाटे मला जाग आली...दयाळाच्या मंजुळ आवाजाने नव्हे हो, तर गजराच्या कर्कश आवाजाने. तुम्हाला हे काय वेगळं सांगायचं? आपण सर्वच जण घड्याळाच्या काट्याला बांधलेलो आहोत. उगवणारा सूर्य, स्वच्छंद विहरणारे पक्षी वगैरे कोण बघतंय? ७.१८ची फास्ट ट्रेन सुटायची.

उचक्या लागल्या की अस्वस्थ व्हायला होतं ना? अगदी काहीसं तसंच आपलं दैनंदिन जीवन वाटू लागतं. यावर उपाय? धुक्यात हरवलेल्या त्या वाटा, पांढरेशुभ्र धबधबे, काळ्याभोर आकाशात चमचमणारं चांदणं, घाटातली ती वळणं आणि तो केवळ 'माझा सह्यकडा'.


कधी पाठीवर सॅक, पायात बूट आणि मनात सह्याद्रीचं प्रेम घेऊन एकटेच निघा. अशा प्रवासाची मजा काही औरच! तुमच्या डोक्यातले विचार अशा काही विलक्षण वळणावर वळतील की तुमचं तुम्हालाच आश्चर्य वाटेल. घरी असताना प्रेझेंटेशन-असाईनमेंटच्या सबमिशनच्या तारखा, कँटीनमधल्या वडापावच्या किमतीमध्ये झालेली दोन रुपयांची वाढ असे सर्व विचार येतात मनात पण तुम्हाला गंमत म्हणून एक गोष्ट सांगते. एकदा मी अशीच बाहेर पडले. रस्त्यावरुन जाताना मला 'सिकाडा' नावाचा एक किडा दिसला. या किड्याची जीवनकहाणी अजब आहे. अंड्यातून बाहेर पडल्यावर किशोरावस्थेत तब्बल सतरा वर्षं खोडाच्या सालीखाली काढतो. त्यानंतर प्रौढ कीटक बाहेर पडतो आणि फक्त दोन दिवस जगतो. दोन दिवस जगण्यासाठी सतरा वर्षं वाट पाहणं? आपण एटीएम समोर दोन मिनिटं तरी थांबतो का? हा विचार रोजच्या गडबडीत मनात नाही येणार. मात्र विरंगुळ्यासाठी केलेल्या प्रवासात आपलं मन रोजच्या रगाड्यातून मुक्त झाल्यामुळे वेगळा, चाकोरीबाहेरचा विचार करायला लागतं. स्वतःलाच स्वतःची ओळख होणं फार गरजेचं असतं, ते अशा वेगळ्या विचारातून आणि अशा माझ्या सहलीं-मधून मला मिळालं.

एकटं गेलं की सोबत तुमचा एकांतवास आणि नीरव शांतता असते. मी कुठेतरी वाचलं होतं- शांततेला आवाज असतो. मला सांगता नाही येणार, कदाचित तुम्ही ही अनुभवलं असेल...एखाद्या मंदिराच्या गाभाऱ्यात घुमणारे दरबारी कानडाचे सूर...काही अंशी तसंच. भयपटाने एकूण एकटं राहण्याची व्याख्या बदलली आहे. मात्र पहाटे साडेतीन वाजता एकटंच जंगलात पाणवठ्या जवळच्या झाडावर बसलात, तर भूत नाही, वन्यजीव दिसतात. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात चक्क वाघ पाणी पिताना दिसतो. वाघासारखा हिंस्र प्रण्याबद्धल भीती असूनही कुतूहल म्हणून तो बघायला आपण जाणं, तो दिसल्यावर होणारा आनंद आणि समाधान, आश्चर्य, अशा विविध भावनांचा एकाच वेळी अनुभव येतो त्याला बघताना. काजव्यांनी भरलेलं झाड म्हणजे अगदी खऱ्या अर्थाने 'तारे जमींपर'.

असंच एकदा आंबोली घाटात एक अद्भुत गोष्ट दिसली. रात्री एक वाजता अविस्मरणीय अशी स्वयंप्रकाशी (बायोल्युमिनसट) बुरशी बघितली. तिथून घरी परतल्यावर वृत्तपत्रात तोच आपला नेहमीचा भ्रष्टाचार, खुनाखुनी...तेव्हा वाटलं , खरंच, या सर्वांपासून किती लांब होतो आपण. या सर्व नकारात्मक गोष्टी आपल्या जीवनाचा अटळ भाग असल्या, तरी काजव्यांनी भरलेलं झाड, स्वयंप्रकाशी बुरशी, पाणी पिणारा वाघ यातून मिळणाऱ्या पॉझिटिव्हिटीकडे का सोयीस्कर दुर्लक्ष करतो?

एकट्याने केलेल्या प्रवासात जसे चांगले, तसे काही वाईटही अनुभव येतात. पण असेही अनुभव आपल्या आठवणींच्या ठेव्याचा अमूल्य भाग असतात. कधी चांगली माणसं भेटत नाहीत, तर कधी आपणच वाट चुकतो. पण एकट्याने केलेल्या अशा प्रवासात,

‘चुकली दिशा तरीही हुकले न श्रेय माझे,
वेड्या मुशाफिराला सामील सर्व तारे.
चुकली दिशा तरीही आकाश एक आहे,
हे जाणतो तयाला वाटेल तिथे न्या रे.’
(चुकली दिशा तरीही...,विंदा करंदीकर)



# ...आणि मला कविता सुचली!

मितवा मुक्ता अनीश,
एफ.वाय.जे.सी. कला

१०वीची परीक्षा झाल्यावर, मी हिमालयात ट्रेकला जाण्याचं ठरवलं होतं. अनोळखी माणसांसोबत, घरापासून एवढ्या दूर जायची माझी पहिलीच वेळ होती. आमच्या १५ जणांच्या ग्रुपमध्ये माझा लांबचा दादा आणि एक मैत्रीण एवढीच काय ती माझ्या ओळखीची माणसं होती. आम्ही ट्रेनने अंबालाला गेलो आणि तिथून मनालीला मिनी बस करून जायचं ठरलं होतं. आम्ही दुपारी अंबालाला पोहोचलो. संध्याकाळपर्यंतच हॉटेलचं बुकिंग केलं आणि पेटपूजा करुन थोडा आराम केला कारण रात्रभर प्रवास करायचा होता.

अंबाला ते मनाली हा रस्ता घाटाचा होता आणि तो एका रात्रीत पार करायचा होता. ड्रायव्हरने सांगितलेलं की तो १० मिनिटांत स्टेशनपर्यंत पोहोचेल.आम्ही हॉटेलमधून चेकआऊट केलं.आणि स्टेशनपर्यंत चालत गेलो, रात्रीचे १० वाजून गेलेले. रस्त्याला फारशी रहदारी नव्हती. आम्ही ठरलेल्या ठिकाणी पोहोचलो. पण ड्रायव्हरचा काही पत्ता नव्हता.पाऊण तास झाला तरी त्याची १० मिनिटं संपतच नव्हती.मला घरची खूप आठवण येत होती. आम्ही जेव्हा केव्हा प्रवासाला जायचो तेव्हा बाबा अगदी ठरलेल्या वेळेच्या ठोक्याला निघायचो आणि मग आम्ही सगळे वेळेआधीच आमच्या मुक्कामावर पोहोचलेले असायचो.

शेवटी, तासाभराने एकदाचा तो ड्रायव्हर आला. आम्ही सगळे गाडीत बसलो आणि गाडी निघाली.मला खिडकी शेजारी बसायला खूप आवडत, म्हणून मी लगेच खिडकी जवळची जागा हडपली.आकाश निरभ्र होतं.चंद्रोदय झाला होता.तो दिवस पौर्णिमेच्या आसपासचा असावा कारण चंद्र वर्तुळाकारात मंदपणे प्रकाशत होता.चंद्राच्या प्रकाशामुळे चांदण्या जणू लाजल्यासारख्या दूर स्वतंत्रपणे चमचमत होत्या.


ड्रायव्हरने गाडीत पंजाबी गाणी लावली होती. त्यातलं अवाक्षरही मला समजत नव्हतं तरीही ती ऐकायला चांगली वाटत होती. आम्ही गावाच्या बाहेर पडलो घाटरस्ता सुरू झाला. बहुतेक सगळे झोपी गेले होते. माझी मैत्रीण माझ्या शेजारीच बसली होती. आम्ही जरी काही बोलत नव्हतो तरीही ती जागी आहे हे मला कळत होतं. रस्ता खरंतर भीतिदायकच होता. एका बाजूला उंच डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी.

वेळ अगदी हळू पुढे सरकत होता. मला राहून राहून घरची खूप आठवण येत होती. मझं घर, उन्हाळ्याच्या सुट्टीत घराच्या पडवीत गाद्यांवर पडून भावंडांशी मारलेल्या गप्पा, घराशेजारचं मोठं मैदान हे सगळं आठवून माझ्या डोळ्यात पाणी येत होतं. १०वी नंतर पुढच्या शिक्षणासाठी बाहेरगावी जायचं माझं खूप आधीच ठरलेलं पण आता ती वेळ जवळ येऊन ठेपली होती आणि माझा हा प्रवास ही माझ्या घराबाहेर पडण्याची पहिली पायरी होती.

जस जसं आम्ही घाट चढत गेलो, तस तसं हवेतला गारवा वाढत गेला. हिमालयातील जादुई हवा तिचा प्रभाव

दाखवत होती .खरंतर मला झोप येत होती पण झोपावसं वाटत नव्हतं . मला लहानपणापासून कविता सुचत होती परंतु नेमक्या शब्दांत मांडता येत नव्हती.

वाटेत आम्ही एका ठिकाणी चहा प्यायला थांबलो. तेवढा कटिंग चहा पिऊन मला मस्त तरतरी आली . पहाटेचे ४ वाजून गेले होते . आता मला दूरवर हिमशिखरे दिसू लागली होती . पूर्व दिशेला लाली आली होती. रात्र संपत आली होती . सूर्य उगवणार होता, लाली चढलेल्या त्या हिमशिखरांकडे पाहताना माझ्या मनात असणारी आयुष्याच्या नव्या सुरुवातीची सगळी भीती हळूहळू नाहीशी झाली. आणि अचानक मला ती रात्र माझ्या आयुष्यातील सर्वात सुंदर रात्र वाटू लागली . कोणतं तरी अगम्य गाणं मी गुणगुणत होते, आणि...मला कविता सुचली



‘ चांदण्यात चांदण्यात मजा येते हिंडण्यात
हृदयाच्या स्पंदनात सारे काही मांडण्यात’

खरंतर त्या प्रवासात फार काही खास घडलचं नाही पण त्या रात्रीने मात्र मला खूप आत्मविश्वास दिला!!!

# प्रवास, एक शिक्षक

प्रचिती म्हात्रे,
प्रथम वर्ष,
कला.

“हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणांच्या मखमालीचे,
त्या सुंदर मखमालीवरती
फुलराणी ही खेळत होती”


बालकवींनी वर्णन केलेला तो अद्‌भूत निसर्ग मी स्वतः फुलराणी होऊन अनुभवण्याची संधी काही वर्षांपूर्वी मला मिळाली क्रिश ह्या चित्रपटाचे ज्या नदी किनारी शूटिंग झाले, सिओबाग मनालीचा डोंगराळ भाग, तो आमचा बेसकॅम्प होता दिवसभराच्या प्रवासाने थकल्यामुळे बरीच लोकं लवकरच झोपली. मी मात्र खूप आतुर होते. दहावीच्या परीक्षेनंतर आईबाबांनी प्रॉमिस केल्याप्रमाणे पहिल्यांदा मला एकटे गिर्यारोहणाला (ट्रेकला) पाठवले होते, ते देखील तब्बल १५ दिवसांसाठी! महिनाभर अगोदर पासूनच मी त्याची तयारी करत होते, पण ह्यामुळे गंमत अशी झाली की कितीही प्रयत्न केला तरी पहिल्या दिवशी टेन्टमध्ये झोप काही येईना. टेन्टच्या बाहेर आले, माझ्या सारखेच अतीउत्साही ४-५ जणं कॅम्पफायर भोवती गप्पा मारत बसले होते. लखलखीत चांदण्यांनी भरलेले आकाश आणि बिसनदीच्या खळखळत्या पाण्याचा आवाज. मी त्यांच्यात जाऊन बसले बंगळूरु, गुजरात, दिल्ली, केरळ अशा विविध प्रदेशातून आलेल्या तरुणांशी संवाद साधत त्या पहिल्याच रात्री त्यांच्याशी खूप छान मैत्री जमली. रात्र कशी सरली ते समजलेच नाही. इतक्या गप्पा-गोष्टी केल्या, इतके अनुभव शेअर केले की दुसऱ्या दिवशी त्यांच्या सोबत जणूकाही वर्षानुवर्षांची मैत्री असल्याचा भास होत होता.

ट्रेक करताना असे आढळले की ५-६ हजार फूट उंचीवरदेखील घरे होती. तिकडची लहान मुले दररोज पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या शाळेत जातं जे अंतर पार करण्यासाठी आम्हाला ५ दिवस लागले तेच अंतर ती मुले दिवसातून दोनदा अगदी आरामात पार करतात. कमीतकमी सुखसुविधांमध्ये आणि कष्टप्रद जीवन जगत असूनही त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू अजिबात ढळत नव्हते.

आम्ही जेव्हा चांद्रखाणी पासच्या ८०० फूट खाली होतो त्या रात्री बेसकॅम्पवरून आम्हाला वादळी वातावरणाचे संकेत येत होते. ते शेवटचे दोन दिवस तूफान पाऊस आणि कडाक्याची थंडी पडत होती. निसर्गाचे ते अक्राळ-विक्राळ रूप पाहून आम्ही पार हादरलो. रेनकोट, प्लास्टिक किंवा इतर कुठलीच गोष्ट आम्हाला त्या पावसापासून वाचवू शकत नव्हती. कपडे सुकत नव्हते, टेन्ट देखील दमट झाले होते. ओलेचिंब होऊन गारठल्यामुळे आमच्यातील काही जणांना हिमबाधा झाली. माझी बोटंसुध्दा काळीनिळी पडू लागली होती. थोड्यावेळाने असे समजले की वर बर्फलोट आला होता, त्यापुढे जाणे म्हणजे सिंहाच्या जबड्यात हात घालण्याइतके घातक होते! काहीही करून पुढच्या ३

तासात खाली उतरणे अतिशय आवश्यक होते. त्यावेळी जाणवले की माणसाने विज्ञानात कितीही प्रगती केली असली तरी निसर्गापुढे तो कस्पटासमान आहे.
त्या उंच डोंगरावर माझे अस्तित्व एका अथांग महासागरातल्या छोट्याश्या शिंपल्या इतके किंवा वाळवंटातल्या वाळूच्या एका कणाइतके क्षुल्लक भासले खाली परतताना आम्हा सर्वांना मोहिमेतून हरून माघारी आल्यासारखे वाटत होते. मात्र आमच्यातल्या एकाने 'डेस्टिनेशन' पेक्षा 'जर्नी' किती जास्त महत्वाची आणि उत्कंठावर्धक असते हे आम्हाला पटवून दिले. कुठल्याही बिकट परिस्थितीत आशावादी राहणे मी त्या क्षणापासून माझ्या वागणुकीत बिंबविलें

रोजचा रेल्वेचा प्रवास करताना जेव्हा क्षुल्लक कारणांवरून भांडणारे पाहिले की मला तो क्षण आठवतो. एका अतिशय चिंचोळ्या पाऊल वाटेवरून पुढच्या गिर्यारोहकाने टाकलेल्या पावलावर पाऊल टाकत आम्ही पुढे जात होतो. फक्त एका दोरखंडाचा काय तो आधार होता. एका बाजूला उंच पहाडी भिंत तर दुसऱ्या बाजूला तितकीच खोल दरी. आपल्याच श्वासाचा आपल्याला आवाज भयाण वाटावा इतकी मनाची एकाग्रता साधत असताना माझे पाऊल वाकडे पडले आणि क्षणात माझा तोल गेला...खोल दरीत कोसळणार इतक्यात मागच्या सोबत्याने मला क्षणार्धात सावरले! तेव्हा श्वासासोबत हृदयाची धडधड सुध्दा ऐकू येत होती. मनोमन देवाचे आभार मानले. जीवघेण्या प्रसंगातून वाचल्यामुळे जीवनाचे खरे मोल समजले. रोजच्या धकाधकीच्या जीवनात छोट्या छोट्या गोष्टीवरून जेव्हा आपला मूड जातो फ्रस्ट्रेशन येतं तेव्हा मला तो ट्रेक आठवतो ...निसर्ग मनुष्याला आयुष्य किती सुंदर, छान, पवित्र, आनंदी आहे हे शिकवतोच पण प्रवासात आलेले प्रसंग आपल्याला आयुष्य किती क्षणभंगूर आहे ह्याची जाणीव करून देतात.
त्या संपूर्ण १५ दिवसात एक गोष्ट प्रामुख्याने जाणवली, भारतात कुठेही राहणाऱ्या तरूणाच्या मनात माझ्यासारख्याच उंच भरारी घेण्याच्या आकांक्षा आहेत, नवनवीन संकल्पना आहेत कितीही बिकट समस्या आल्या तरी संघर्षाने त्यावर मात करण्याचे मानसिक बळ आहे. जरी इतरवेळी हीच माणसे टेक्नॉलॉजीच्या जाळ्यात अडकली असली तरी निसर्गाच्या अप्रतिमपणाची त्यांना जाणीव आहे. हा प्रवास जरी फक्त २ आठवड्यांचा होता, तरी आयुष्यभर पुरे पडेल एवढ्या सुंदर अनुभवांचा व आठवणींचा खजिना मी सोबत घेऊन आले आहे. आयुष्याकडे पाहण्याचा एक नवा-वेगळा दृष्टिकोन ह्या प्रवासाने मला दाखवून दिला...



# डोळस की आंधळी श्रध्दा: क्षेत्र-तीर्थक्षेत्र

डॉ. प्रणोती चिरमुले,
समाजशास्त्र व
मानववंशशास्त्र
विभाग

आई वडिलांच्या लग्नाच्या २५व्या वाढदिवसाच्या निमित्ताने थेट तिरुपतीला जाऊन बालाजीचे दर्शन घ्यायचे आम्ही ठरवले. कॉलेजच्या त्या तरुण वयात तीर्थक्षेत्र दर्शनाचे विविध पैलू असू शकतात हे जाणवलेच नाही. मग काय निघालो आम्ही सहपरिवार श्रीक्षेत्रतिरुपतीला. पोहोचण्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी शुचिर्भूत होऊन आम्ही मंदिराच्या आवारात दाखल झालो. आत प्रवेश करताच एक अजब प्रकार पाहायला मिळाला. सगळीकडे लोखंडी गज टाकून रांगा तयार होत्या, जणू काही प्रत्येक वर्गातील लोकांसाठी एक पिंजरा तयार केला होता. पण यालाही एक धक्कादायक रूप होतं- पैशाचं. देवाच्या दर्शनासाठी पैसे घेतले जात होते. ज्यांना हे पैसे देणं शक्य नव्हतं त्यांच्यासाठी फ्री दर्शनाची सोय होती-अलिखित अट फक्त एकच- वेळेकडे पाहायचे नाही. गिरगावातल्या मराठमोळ्या वातावरणात वाढलेल्या मला, जिथे रस्ता ओलांडला की मंदिर होतं आणि जिथे जाण्यासाठी कुठलीही अट नसायची या सगळ्या गोष्टी खूप नवीन होत्या, पचनी पाडण्यास खूप कठीण होत्या. त्या वेळी पहिल्यांदा धर्माला आर्थिक पैलू असतात याची जाणीव झाली. मन अगदी कडू होऊन गेले, तब्बल सहा तास आम्ही 'फ्री' दर्शनाच्या रांगेत उभे होतो, आणि अवघ्या तीन सेकंदांमध्ये आम्ही दर्शन घेऊन गाभा याबाहेर पडलोही, पण दर्शन झालं की नाही याचा मात्र उलगडा होत नव्हता! दुसऱ्या दिवशी व्यवस्थित दर्शन होईल या आशेने आम्ही ५० रुपयाच्या रांगेत उभे राहिलो. आमच्या बाजूच्या रांगेत (फ्री दर्शनाची) सात पर्वतरांगा पार करून आलेली लोकं उभी होती, त्यांना तिथे उभे राहिलेलं पाहून मला अगदी अपराध्यासारखं वाटू लागलं. मनात आशा, प्रार्थना, विश्वास, घेऊन ही लोकं तासंतास तिथे ताटकळत उभी होती. या प्रवासादरम्यान पहिल्यांदा धर्माचे विविध पैलू मला दिसून आले. या लेखात मला अशाच दोन प्रवासांबद्दल बोलायचे आहे.

'लय भारी' चित्रपटातले पहिले-वहिले दृश्य मी जेव्हा-केव्हा बघते तेव्हा माझ्या अंगावर अगदी काटा उभा राहतो. पंढरीच्या त्या विठ्ठलाचे दर्शन घ्यायला पायी चालत जाणाऱ्या त्या वारकऱ्यांकडे पाहून मनात विचारांचा ऊहापोह होतो. जेष्ठ महिन्यात बळीराजा पेरण्या उरकून आषाढाच्या वारीसाठी निघतो. पाऊस पडेल की नाही, पीक येईल की नाही, एक वेळचं जेवण तरी नशिबी असेल की नाही याची काहीही खात्री नसताना, हा वारकरी समाज पूर्ण श्रध्देने वर्षानूवर्ष हा प्रवास करतोय. हिरव्यागार पर्वतरांगांमधून, भगवंताचे नामःस्मरण करत तो चालत राहतो. महागाई वाढली की शहरातला आर्थिक सबळ माणूस, देवाला, समाजाला, राज्याला किंवा राष्ट्राला दोष द्यायला मागेपुढे बघत नाही. पण कोरड्या पडलेल्या जमिनीतून पिकाचा हिरवा कोंब आणि आकाशातल्या रिकाम्या ढगांमधून पाण्याचा वर्षाव होईल ही आशा

शेतकरी सोडत नाही. हा प्रवास म्हणजे फक्त काही मैल पार करण्यापर्यंत मर्यादित नसतो तो आपल्या विविध परिस्थितींना बदलण्याचा मार्ग शोधण्याचा असतो. त्या आशावादी वारकर्‍यांचा वारीतून पडलेल्या पाऊलखुणांमध्येच एक तीर्थक्षेत्र लपलेले आहे. तीर्थक्षेत्र-तीर्थक्षेत्र म्हणजे नक्की असते तरी काय? ते म्हणजे आशेचा स्त्रोत, विश्वासाचा अखंड समुद्र आणि श्रध्देचे स्थान. राजकारण, समाजकारण, आर्थिक डावपेच झुगारून धार्मिक-आध्यात्मिक व्याख्या रचत चाललेल्या या प्रवासातून (वारी) शिकण्यासारखे बरेच काही आहे.

वारीपेक्षा आगळा वेगळा आहे तो आजच्या युवा पिढीने केलेला शिर्डीचा प्रवास. जळगावला जाताना रस्त्यानी, घाटातून अनेक तरुणांना चालत शिर्डीला जाताना पाहिले आहे. ते सर्व तरुण ग्रुप करून जात असतात. त्यांना पाहून माझ्या मनात अनेक प्रश्न उभे राहतात. काय कारण असेल हा तब्बल २६०-२५० कि.मी. चा मार्ग पायी पार करण्यामागे? काही वैयक्तिक अडचणी? आर्थिक अस्थिरता? माझ्या मनात असे अनेक प्रश्न उभे राहतात. कारण ते सर्व तरुण अंगात विविध राजनैतिक पक्षांचे टीशर्ट घालून असतात. एवढा मोठा प्रवास करण्यासाठी राजकारण हे कारण पुरेसं आहे का? गेल्या काही वर्षांमध्ये अनेक राजकीय पक्ष उभे राहिले आणि त्यांनी दोन मुद्दे आपलेसे केले- धर्म आणि तरुणाई. या विविध पक्षांनी या दोघांची सांगड घालून दिली. तरुणांच्या बेरोजगारीचा मुद्दा, युवा पिढीच्या समस्या या सगळ्यावर कार्यक्रम आयोजित करणं कमी झालं. युवा नेते म्हणून तरुण पुढे आले आणि धर्माशी घातलेली ही सांगड पुढे चालवू लागले. शिष्यवृत्ती, आर्थिक, सामाजिक मदत जरी या पक्षांनी यांना दिली असली तरीही हे सर्व तो पायी प्रवास करतच राहतात. परतफेड म्हणून किंवा एक धाडसी प्रयत्न म्हणून. पण ही तरुणाई हसत खेळत चालत राहते हेच एक आश्चर्य राहिलं.

वरीचा प्रवास हा भावनांचा प्रवास आणि भक्तीचा वारसा आहे. धर्माची आर्थिक बाजू झुगारून हा गावाकडचा व्यक्ती, माणुसकी, भक्ती, विश्वास, धर्म आणि आशा यांची व्याख्या लिहीत असतो. तशी आजची तरुण पिढी धर्माची आणि पैशाची सांगड जरी घालत असली तरी हिमतीची आणि विश्वासाची बाजू सोडत नाही. तीर्थक्षेत्री केलेला प्रवास हा स्वतःमधल्या आध्यात्मिक ऊर्जेचा घेतलेला ध्यास असतो. ही आंतरिक शक्ती जगण्याचे कारण व उमेद देत असते असे म्हटले तरी वावगं ठरणार नाही. पण आज धर्म आणि आध्यात्म बऱ्याच प्रमाणात दुरावलेले दिसतात आणि पैसा व राजकारण पुढे आलेलं दिसतं. या दोन्ही प्रवासांमध्ये श्रध्दा तर आहेच पण एक प्रश्न अनुत्तरीतच राहतो तो म्हणजे यामधली डोळस श्रध्दा कुठली आणि भोळी, आंधळी कुठली?

# आमोद

## १९, २० व २१ जानेवारी २०१७

ब. न. पुरंदरे

चार ओळींची गोष्ट

महाराष्ट्राची लोकधारा

सुर संगम

स्वरक्षेत्र

कार्टून फॅक्टरी

पोस्टरबाजी

बहूरूपी

शब्दांच्या पलिकडे

काव्य-नाटुकली

चौकशी व सहभागासाठी संपर्क क्र.

मनोज्ञा तुरुमेल्ला : 7710005771

प्रांजल हळडणकर : 9820247194

REALITYDREAMSHIP.COM